**प्रेसनोट दिनांक २४/०६/२०१९**

**पोलीस स्टेशन- येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प) या संकल्पने अंतर्गत पुणे कल्याणीनगर भागातील इंडीयन बँक व एटीएम सेंटर, आयसीआयसीआय बँक व रिक्षा स्टँड, येथे भेट देवून बैठक बँक अधिकारी, कर्मचारी व रिक्षा चालक, मालक यांची बैठक घेवून त्यांना मागदर्शन केले बाबत.**

---

कम्युनिटी पोलीसींग व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प) या संकल्पनां अंतर्गत श्री.अजय वाघमारे, पोलीस निरी.(गुन्हे) अति.कार्यभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.२०/०६/२०१९ रोजी १५:३० वा. ते १८:०० वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे हद्दीतील कल्याणीनगर भागातील (१) इंडियन बँक व एटीएम सेंटर, (२) आयसीआयसीआय बँक (३) रिक्षा स्टँड भेट देऊन तेथील बँक अधिकारी, कर्मचारी व रिक्षाचालक यांच्या अडीअडचणी समाजावून घेवून त्यांना घरफोडी चोरी, जबरी चोरी, महिलां संदर्भातील गुन्हे, छेडछाडीचे प्रकार, सार्वजनिक सुरक्षा याबाबत माहिती देवून सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प) या संकल्पनेची माहिती देवून सीसीटीव्ही कॅमेरांचे महत्व समजावून सांगितले. बँकांचे ठिकाणी व एटीएम सेंटरचे ठिकाणी बाहेरील परिसर रोड कव्हर होईल अशा रितीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत आवाहन करून लेखी पत्र दिले. तसेच रिक्षा चालकांना पोलीसांना वेळोवेळी आजूबाजूला घडणाऱ्या लहानसहान घटनांची माहिती देवून गुन्हे नियंत्रण व गुन्हे उघडकीस आणणेचे कार्यात पोलीसांना सहकार्य करणेबाबत आवाहन केले. तसेच पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांसाठी राबविण्यात येणारे विविध १४ योजनांची माहिती देण्यात आली आहे.

अशा प्रकारे श्री.अजय वाघमारे, पोलीस निरी.(गुन्हे) अति.कार्यभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशन कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी कम्युनिटी पोलीसींग, व सहकार्यातून सुरक्षेकडे (सीसीटीव्ही कॅमेरे प्रकल्प) या संकल्पने अंतर्गत वरील प्रमाणे बैठका घेवून मार्गदर्शन करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.






**( अजय वाघमारे )**
पोलीस निरी.(गुन्हे),
अति.कार्यभार व.पो.निरी.
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे





